**सं.फौ.ख.क्र.५८८१/२०२५.**

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७४ चा अधिनियम दोन प्रकरण एकविस अन्वये संक्षीप्त संपरिक्षेचा तपशिल**

३ रे **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोल्हापूर, यांचे न्यायालयात**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | - | ०५/०१/२०२५. |
| २. | अहवालाचा दिनांक | - | ०५/०१/२०२५. |
| ३. | फिर्यादीचे नांव वय व पत्ता | - | शाहुपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर. |
| ४. | आरोपीचे नांव वय व पत्ता | - | सनि संयज गायकवाड,<br>व.व. - २५ रा.सदर बाझार, कोल्हापूर. |
| ५. | गुन्हा | - | महा.पोलीस ॲक्ट कलम ११५/११७. |

**गुन्ह्याचा तपशिल**

तुम्ही वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही सार्वजनिक रस्त्यात येणा-या जाणा-या व्यक्तीस त्रास होईल अशारितीने थुंकुन उपद्रव करीत असताना मिळून आला म्हणून तुम्ही महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ११५/११७ खालील दंडनीय गुन्हा केला. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे.

आरोपीस आरोप वाचून दाखविणेत आला व समजाविणेत आला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर **होय**

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय?

उत्तर **होय**

प्र. ३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर **मला गुन्हा कबूल आहे.**

आरोपीची सही

समोर,

Digitally signed by PANKAJ KHEMCHAND AHIR
Date: 2026.05.11 13:23:32 +0530

दि.०९/०५/२०२६

( पंकज खे. अहिर )
३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी तथा
पॅनेल प्रमुख लोकअदालत कोल्हापूर.

आजरोजी सदरचे प्रकरण राष्ट्रीय लोकन्यायालयात ठेवणेत आले. सदरचा गुन्हा आरोपीने पहिल्याच तारखेला स्वेच्छेने कबूल केला आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने असे कथन केले की, आर्थिक परिस्थिती गरीबीचे असलेने कमीत कमी शिक्षा व्हावी. त्यामुळे अशा परिस्थितीत आरोपी यांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप पाहता आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्यांना दयाबुध्दी दाखविणे संयुक्तीक होणार आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

**१)** आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ११५/११७ प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येत असून त्यांना रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त ) दंड व दंड न दिल्यास (१) दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत आहे.

**२)** आरोपीस न्यायनिर्णयाची प्रत मोफत देणेत यावी.

Digitally signed by PANKAJ KHEMCHAND AHIR
Date: 2026.05.11 13:23:42 +0530

दि.०९/०५/२०२६

( पंकज खे. अहिर )
३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी तथा
पॅनेल प्रमुख लोकअदालत कोल्हापूर.